# अदिवासीएत्तरांच्या मराठी कथेतीतील आदिवासी समाजजीवनाचे चित्रण

**- प्रा.डॉ.अमर कांबळे**
मा.श्री.अण्णासाहेब डांगे कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,हातकणंगले ,
जिल्हा . कोल्हापूर 416109 (महाराष्ट्र)

**प्रस्तावना :** आदिवासी समाज हा स्वयंभू आणि निसर्गप्रेमी आहे. आदिम संस्कृती हेच त्यांचे जीवन संचित आहे. मराठी साहित्यात कथा,कादंबरी,नाटक,कविता इत्यादीमध्यें आदिवासी जीवन चित्रण प्रामुख्याने आलेले दिसते. यामध्ये मराठी कथा साहित्यात आदिवासी समाज जीवनानुभव तुलनेने कमी असून विविध आदिम जमातींना त्यांच्या जीवन संस्कृतीला मराठी कथेने कवेत घेण्याचा प्रयत्न केला आहे. यातील अनेक कथा या आदिवासीएतरांनी लिहिलेल्या आहेत. त्या रंजनवादी, भावनात्मक , सौंदर्यात्मकदृष्टीने लिहिल्या गेल्याचे दिसते. यातील काही कथा तर निव्वळ माहिती संकलनासाठी लिहिल्या गेल्या असव्यात असे त्याचे स्वरूप आहे. वास्तविक आदिवासी समाज, त्यांचे जीवन, त्यांच्या व्यथा वेदना ह्या इतरांपेक्षा वेगळया आहेत. माणूस म्हणून ज्यांना जगण्याचा हक्कच नाही ,त्यांच्या अस्तित्वाला आणि त्यांच्या जगण्याला नाकारण्याची प्रवृत्ती प्रस्थापित समाजजीवनात असलेली दिसते.आदिवासी समाजाचे सर्वांगीण पातळीवर मराठी साहित्याने चित्रण केले नसले तरी आदिवासी समाज जीवनाला न्याय देताना मराठी कथा साहित्य पाहायला मिळते.

**Keywords ¼कीवर्ड) : आदिवासीकथा , माडिया , गोंड , भिल्ल , कातकरी , उलगुलान**

**विषय विवेचन :** मराठी साहित्यातील प्रामुख्याने र.वा. दिघे,नारायण शिंदे ,पा.गो.गांगल,धैर्यशील शिरोळे श्री.म.माटे इत्यादी साहित्यिकांच्या कथांचा यठिकाणी विचार केला आहे .र.वा. दिघे यांच्या 'वादळ' , 'दर्यातील झुंज' या कथेत आदिवासी समाजाचे प्रामुख्याने कोळी समाज जीवन येते. 'वादळ' या कथेत सारंग आणि नागेश यांचे जैतावरील प्रेम त्यातून निर्माण झालेले अनेक ताण तणाव यासोबतच कोळी समाज जीवन संस्कृती ,त्यांचे दैनंदिन जीवनव्यवहार याविषयीची माहिती मिळते. 'दर्यातील झुंज' या कथेमध्ये प्रेमाचा त्रिकोण दाखवण्याचा प्रयत्न यांनी केला आहे. रंजक पद्धतीने पारंपरिक कथा तंत्राचा वापर करून दिघे यांनी यांनी दोन्ही कथेत कोळी समाज जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे

माडिया भिल्लांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी 'डोंगर माथ्यावरील दिवा ' ही कथा बस्तरच्या निर्भिड अरण्यातील भिल्ल आदिवासींच्या जीवनाला न्याय देण्याचा प्रयत्न करते. इंग्रजांच्या जुलमी अन्यायाविरोधात संघर्ष करणारा सुधारणावादी पांडुरंग हा या कथेचा गाभा आहे. आदिवासी समाज सुधारणा नाकारतो. इतरांनाही विशेषत: इंग्रजानाही त्यांच्यामध्ये सुधारणा नको असते . अशा काळात आदिवासी समाजाचे प्रबोधन करून भिल्ल समाजाच्या उत्थानाचा विचार पांडुरंग मांडत असतो. भिल्लांचा तारणहार आणि इंग्रजांचा कर्दनकाळ म्हणून तो या कथेत येतो. सुरुवातीला आदिवासीच त्याला स्वीकारत नाहीत पण नंतर मात्र त्याचे नेतृत्व स्वीकारतात आणि त्यांनी लावलेला क्रांतीचा दिवा तेवत ठेवण्याचा विचार करतात. इंग्रजांना हा क्रांतीचा उलगुलान वाटतो त्यामुळे पेटण्यापूर्वीच ही चिंगारी जागीच संपवायचे असल्यामुळे ते पांडुरंगाला मारून टाकतात .आदिवासी समाजात एक स्फुल्लिंग चेतवणारी त्यांचे प्रबोधन करणारी त्यांच्यात स्फूर्ती निर्माण करणारी कथा नारायण शिंदे यांनी रेखाटली आहे.

बाबुराव बागूल यांची 'भूक' याही कथेत आदिवासी समाज जीवनाच्या व्यथा-वेदना व्यक्त होतात.भूक या कथेत भागु कोळीन पारंपारिक पद्धतीतीने मासे पकडून आपल्या मुलांची भूक भागवत असते पण पावसाळयाच्या दिवसात भुकेने व्याकूळ असणाऱ्या मुलांना ती ती अहीर मासा आणि साप यातला फरक कळला नसल्याने ती साप खाऊ घालते. ज्यावेळी तिच्या हे लक्षात येते त्यावेळी ती हा धक्का सहन करू शकत नाही.

आदिवासी समाजाच्या प्रचंड दारीद्र्याची,पोटापाण्याच्या समस्येची करूण कहाणी त्याच्या जीवनप्रश्नांची व्यथा या कथेत प्रत्ययकारीपणे रेखाटली आहे.

'उपेक्षितांचे अंतरंग' या श्री.म.माटे यांच्या कथासंग्रहात 'बन्सिधरा आता तू कुठे र जाशील' ही कथा आदिवासी कातकरी समाजाचा उल्लेख येतो. सातारा जिल्ह्यातील लेंगरे गावच्या माळावर ओढ्याकाठी कातकऱ्यांचा तळ पडतो आणि यात्रेत चुकलेला बन्सीधर त्यांना सापडतो. त्याच्या जीवनाची होणारी परवड अत्यंत सुंदर पद्धतीने दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. कातकरी समाजाचे संपूर्ण जीवन या कथेत मात्र येताना दिसत नाही. पा.गों. गांगल यांच्या 'राष्ट्राचे भवितव्य' यासारख्या कथा ह्या आदिवासी कातकरी समाज त्यांचे जीवन व्यवहारातील चढ उतार दाखवणारी आहे. शहरी संस्कृतीचे आदिवासी जीवनाचे अंतर राष्ट्राचे भविष्य कथेत येते. आदिवासींचा अंधविश्वास, देवावरची श्रद्धा त्यातून निर्माण झालेल्या अंधश्रद्धा. बालविवाह ,दारू पिणे कातकरी, ठाकर समाज जीवन त्यांचा आरोग्याचे प्रश्न कुपोषण यासारख्या जीवन वास्तवाला स्पर्श करणाऱ्या या कथा आहेत.

धैर्यशील शिरोळे हे डॉक्टर प्रकाश आमटे यांच्या हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्पात वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करतात त्यावेळी त्यांना आलेल्या आदिवासी समाजाचे वेगळे अनुभव त्यांनी 'आदिवासीच्या कथा आणि व्यथा' या पुस्तकात रेखाटलेल्या आहेत. यातील 'बाबूशाचा सर्पदंश' या कथेत सर्पदंश झाल्यावर आदिवासी समाज बाबुश्याला भगताकडे घेऊन जातात .डॉक्टरांकडे नेण्यापेक्षा त्यांना हाच सोपा आणि भरवशाचा मार्ग वाटतो. त्यामुळे अनेक वेळा योग्य उपचार न मिळाल्यामुळे आदिवासींच्या जीवावर बेतते. हेच अज्ञान दूर करणारी आणि अंधश्रद्धा बाजूला सरणारी कथा म्हणजे 'बाबूशाचा सर्पदंश' यात तो डॉक्टरकडे गेल्यामुळे वाचतो आदिवासी समाजच्या अंधश्रद्धामुळे त्यांच्यावर बेतलेला प्रसंग दाखवला आहे 'पितृत्व' कथेमध्ये सुद्धा आहे गावातील गोंड आदिवासीमधील पारंपरिक विवाह, निसर्गवलंबी जीवन आणि आदिवासींच्या आवाक्याबाहेरचे यंत्रणा त्यातून होणारे शोषणाचे चित्र दाखवलेले आहे. 'घरघुशी', 'भयान वास्तव' यासारख्या कथांमध्ये आदिवासी समाजाच्या छोट्या-छोट्या घटना प्रसंगांमध्ये किती टोकाचा संघर्ष, जातपंचायतिचे महत्व याचे चित्रण येते 'आडलेली बाळंतीन', 'बिबट्याचा हल्ला' आदिवासी समाजाच्या विदारक परिस्थितीची जाणीव करून देतात.धैर्यशील शिरोळे हे व्यवसायाने डॉक्टर आहेत.ते आदिवासी भागात राहतात .त्यामुळे त्यांचे आलेले पेशेंट त्यांचे अनुभव याची माहिती त्यांनी कथारुपात मांडली आहे. कथेच्या रचनातंत्राच्या मर्यादा घेऊन या कथा प्रकटतात .कथेचा सत्यांश असल्याने आदिम समाजाचे जीवन नक्कीच वाचकांना अनुभवता येते. बल्हराम चुडापुरे यांची हकारा या मासिकातून प्रकाशित झालेली ' कमली' ची कथा आदिवासी स्त्रियांची व्यथा मांडते.कामली एक वेडी आहे पण तिला भूक लागलेली आहे पोटाची आग शमवण्यासाठी तिच्या वेडेपणाचा फायदा घेऊन कशी इतरांच्या अन्याय अत्याचाराला बळी पडते याचे वर्णन या कथेत आले आहे.

आदिवासी समाजाचे मराठी कथेतील जीवन चित्रण विचारात घेतल्यानंतर आपणास असे दिसून येते की रुढार्थाने यातील काही कथा ह्या कथा वागमायाचे संकेत पळताना दिसत नाहीत.विशेषत्वाने धैर्यशील शिरोळे यांच्या कथा अनुभव कथन करणाऱ्या वर्णनपर कथा आहेत. आपल्याला आलेल्या अनुभवांचे संकलन 'आदिवासी कथा व्यथा' यामध्ये पाहायला मिळतात . आदिवासी जीवनातील श्रद्धा, अंधश्रद्धा, त्यांची जीवन पद्धती, चालीरीती, पेहराव, कुटुंब व्यवस्था यासारखे विषय निर्देशित करणाऱ्या या कथा आहेत. आदिवासींच्या वर होणारा अन्याय अत्याचार त्यातून पेटून उठणारे आदिवासी त्यांचा संघर्ष आणि एकूणच आदिवासी जीवनाला सर्वांगीण न्याय देणाऱ्या कथा आपल्याला पाहायला मिळत नाहीत. आदिम समाजजीवन सर्वस्वी व्यापून त्यांचे परिपूर्ण जीवन संचित कवेत घेण्यात या कथा कमी पडल्याचे दिसते.

'कमली', 'सिद्धमा' यासारख्या कथेमधून आदिवासी स्त्रियांचे जीवन रेखाटण्याचा प्रयत्न कथाकारांनी केला असला तरी आदिम स्त्री जीवनाला परिपूर्ण आणि सर्वांगीण न्याय देताना मात्र या कथा दिसत नाहीत. आदिवासी स्त्रीचे कुटुंबव्यवस्थेतील स्थान, आदिम संस्कृतीतील तिचे महत्व, तिचे कष्ट, हाल अपेष्टा, आदिम स्त्रियांची होणारी घुसमट, अज्ञान आणि अंधश्रद्धा यामुळे पिचलेले स्त्रीत्व, प्रस्थापितांकडून होणारे शोषण, अन्याय अत्याचार त्याविरोधी उमटणारा प्रतिशोध, क्रांतिसूर याविषयीचे सविस्तर वर्णन करणाऱ्या कथा मराठीत ताकतीने येताना दिसत नाहीत.

मराठीत आदिवासी समजा जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा स्वतःचे एक वेगळे अनुभवविश्व प्रकट करताना दिसतात. लेखकाची भाषा ही शहरी आणि प्रमाण असली तरी अनेक ठिकाणी कथेमध्ये आदिम

जमातींच्या विविध बोली भाषेचा वापर होताना दिसतो. अर्थात कथानकाला आणि पात्रांना जिवंतपणा येण्यासाठी त्यात ठसठशीतपनणा येण्यासाठी हवी असणारी ज्या त्या जमातींच्या बोली भाषेची जोड देताना मात्र लेखकांना मर्यादा आलेल्या आहेत. शहरी,ग्रामीण जीवन यांच्याशी तुलना करताना आदिवासींची होणारी घुसमट, त्यांच्यातील अज्ञान अंधश्रद्धा पारंपारिक जीवनपद्धती,संस्कृती चालीरीती समूह जीवनाला असणारे महत्व अधोरेखित करणारे जीवन चित्रण विस्ताराने येत नाही. मात्र काही कथा या आधुनिकतेला वाव देणाऱ्या प्रबोधनात्मक चळवळीला गती देणाऱ्या कथा असलेल्या दिसून येतात. उपमा अलंकार,रूपके याबाबतीत या रूढ साहित्य पठडीत या कथांचा समावेश करता येत नाही.

**संदर्भ :**

1) तुमराम विनायक , मराठी आदिवासी साहित्य
2) मुनघाटे प्रमोद ,मराठी आदिवासी साहित्य
3) वाल्हेकर ज्ञानेश्वेर आदिवासी साहित्य एक अभ्यास
4) रोंगटे तुकाराम ,आदिवासी साहित्य नियतकालिकातील
5) गावित माहेश्वरी, आदिवासी साहित्य